# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त

कार्यालय दुरध्वनी : २४०३ ३९९ - ४००
फॅक्स (०२४०) : २४०३ २२४, २४०३३३५
Email : bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)


## परिपत्रक

य परिपत्रकाद्वारे सर्व संबधीतांना सुचित करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद तर्फे घेण्यात येणारी ४ थी पेट -२०१७ ही परीक्षा दि. १४ व १५ जुलै, २०१७ रोजी चारही जिल्हयाच्या परिक्षेत्रात घेण्यात येणार आहे. या परिक्षेसाठी विविध विद्या शाखामधुन विद्यार्थी पेट परिक्षा देत आहेत, यासाठी औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद जिल्हयातील विविध महाविद्यालयामध्ये पेट २०१७ साठी परिक्षा केंद्र म्हणून निवडण्यात आली आहेत. ०१ जुलै, २०१७ रोजी सर्व पात्र व अपात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या वेब साईटवर प्रसिध्द केली जाणार आहे. यावर ज्या विद्यार्थ्यांचे काही आक्षेप असतील त्यांना १ जुलै ते ४ जुलै, २०१७ पर्यंत वेळ दिला जाणार आहे, त्यानंतर ६ जुलै ते १० जुलै पर्यंत संबंधीत विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले जातील व प्रत्यक्ष १४ व १५ जुलै, २०१७ शुक्रवार व शनिवार, रोजी सर्व विद्या शाखेच्या विद्यार्थ्यांची पेट परिक्षा मराठवाडा विभागातील वेगवेगळया २० परिक्षा केंद्रावर घेतली जाणार आहे. यासाठी जिल्हा निहाय अधिष्ठातांची पेट समन्वयक म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. परिक्षेच्या काळात कोणत्याही विद्यार्थ्यांला हॉल तिकीट, परिक्षा केंद्र, काही नावात बदल इतर काही अडचणी निर्माण झाल्यास त्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र विभागात प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली PET -2017 Facilitation cum counselling केंद्र स्थापन करण्यात आले आहे त्यासाठी विभागात सर्व सुविधा करण्यात आली आहे. अधिक माहिती विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तरी सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

प्रभारी अधिकारी

विद्यापीठ प्रागंण, :
औरंगाबाद. :
संदर्भ - क.पीजी/पीएचडी/२०१७/3909
दिनांक ३०/६/२०१७ :